आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ जून २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या निकालांनंतर आता सत्तास्थापनेसाठी हालचालींना वेग
- एनडीएच्या बैठकीत आघाडीचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची सर्वसंमतीनं निवड / तर, जनतेनं मोदी यांना नाकारलं असल्याचा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा इंडिया आघाडीच्या बैठकीत दावा
- लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारत उपमुख्यमंत्रीपद सोडण्याचा देवेंद्र फडनवीस यांचा इरादा
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे २ हजार ३०३ अंकांची वाढ
- टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आयर्लंडविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

  **आणि**

- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या रोहन बोपन्ना आणि मॅथ्यू एब्डेन यांची पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ जून २०२४ - बुधवार

<><><><><>

लोकसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग आला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीनंतर मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि प्रधानमंत्रीपदाचा, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा त्यांच्याकडे सुपूर्द केला. राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आणि नवं सरकार स्थापन होईपर्यंत कामकाज पाहण्याची विनंती केली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी आज १७ वी लोकसभा विसर्जित केली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीनं रणनीती ठरवण्यासाठी एनडीएच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांची बैठक आज नवी दिल्ली इथं झाली. प्रधानमंत्री मोदी यांच्या कार्यकाळात देशानं केलेल्या प्रगतीबद्दल सर्व नेत्यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं. विकसित भारतासाठीचा मोदी यांचा दृष्टिकोन स्पष्ट आहे आणि हे ध्येय पूर्ण करण्यासाठी सर्व घटकपक्ष त्यांना साथ देतील, अशी ग्वाही बैठकीत देण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, लोक जनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान, तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार या बैठकीला उपस्थित होते. एनडीएच्या सर्व घटक पक्षांनी आपली समर्थनपत्रं दिली. तसंच या बैठकीत एनडीएचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची सर्व संमतीनं निवड करण्यात आली. एनडीएच्या संसदीय नेत्याची निवड ७ जून रोजी केली जाणार आहे.

<><><><><>

इंडिया आघाडीची बैठकही आज काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी झाली. नव्या सरकारच्या स्थापनेबाबत आघाडीचं धोरण काय

असावं, याविषयी या बैठकीत चर्चा झाली. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी, तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते डी. राजा यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

इंडिया आघाडीनं एकजुटीनं, समन्वयानं आणि पूर्ण ताकदीनं निवडणूक लढवली, असं सांगून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आघाडीच्या सर्व नेत्यांचं अभिनंदन केलं. या निवडणुकीत जनतेनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पूर्णपणे नाकारलं आहे. हा त्यांचा राजकीयच नाही, तर नैतिक पराभव आहे, असं खर्गे यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत राज्यातल्या भाजपाच्या पराभवाची जबाबदारी आपण घेत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. आता पक्षात पूर्णवेळ काम करण्यासाठी उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावं, अशी विनंती आपण पक्ष नेतृत्वाला करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, देवेंद्र फडनवीस यांनी सरकारच्या बाहेर पडून काम करण्याची गरज नाही. त्यांनी सरकारमध्ये राहूनच संघटनेला मदत करावी, अशी विनंती आपण

फडनवीस आणि केंद्रीय नेतृत्वालाही करणार असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी वार्ताहर परिषदेत बोलताना सांगितलं.

महायुतीच्या पराभवाची पूर्ण जबाबदारी सर्व पक्षांची एकत्रित आहे. त्यावर एकत्रितरित्या चर्चा करुन तोडगा काढू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. राजीनाम्याच्या निर्णयासंदर्भात फडनवीस यांच्याशी चर्चा करू असंही ते म्हणाले.

<><><><>

आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा होत आहे. पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली सुरु करण्यात आलेला हा एक जागतिक उपक्रम आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पर्यावरण दिना निमित्त जनतेला शाश्वततेवर आधारित चांगल्या आणि हरित जगाची निर्मिती करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचं आवाहन केलं आहे. मानवता आणि निसर्ग यांच्यातला सुसंवाद हा शाश्वत जीवनाचा पाया असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पर्यावरण दिनानिमित्त दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित, 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथल्या बुद्ध जयंती उद्यानात एक रोपटं लावलं.

पर्यावरण दिनाचं औचित्य साधून केंद्रीय संचार ब्युरो, पुणे महानगरपालिका आणि आयएमईआरटी महाविद्यालय यांच्या वतीने आज कर्वेनगर इथल्या महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

<><><><>

मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण केंद्र इथं जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आज कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची बांबुविषयी माहिती देणारी ध्वनिचित्रफीत दाखवण्यात आली. या कार्यक्रमात

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कल्पवृक्ष बांबू पर्यावरण शाश्वतता परिषद २०२४ या स्मरणिकेचं प्रकाशन केलं. या कार्यक्रमाला कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल हे देखील उपस्थित होते. जिवाश्म इंधनाचा वापर बंद केल्याशिवाय मानवी समाज जगू शकणार नाही, याला बांबु हाच पर्याय असल्याचं पाशा पटेल यांनी यावेळी सांगितलं.

मुंबई महानगरपालिकेनं प्रथमच हवामान विषयक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक घोषित केलं असून, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीच्या या अंदाजपत्रकात हवामान विषयक उपक्रमांसाठी १० हजार २२४ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

**<><><><><>**

देशाच्या शेअर बाजारातल्या कालच्या घसरणीला आला घालत आज मोठी तेजी नोंदवली. व्यवहार सुरू झाले तेव्हा थोड्याफार प्रमाणात घसरलेल्या शेअर बाजारांनी नंतर तेजीचा रस्ता पकडला आणि दिवसअखेरपर्यंत त्यात वाढच होत गेली. व्यवहार संपले तेव्हा मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २ हजार ३०३ अंकांची तेजी नोंदवून ७४ हजार ३८२ स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७३६ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ६२० अंकांवर बंद झाला. निफ्टी बँकही २ हजार १२६ अंकांची वाढ नोंदवून ४९ हजाराच्यावर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजारानं आज एकाच दिवसांत सर्वाधिक व्यवहारांचा नवा विक्रम प्रस्थापित केला. सहा तास १५ मिनिटांच्या कालावधीत १ हजार ९७१ कोटी रुपयांच्या ऑर्डर आणि २८ कोटी ५५ लाख रुपयांचे ट्रेड एका दिवसांत हाताळले गेले.

**<><><><><>**

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना आयर्लंडसोबत न्यूयॉर्क इथं नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा आयर्लंडच्या तिसऱ्या षटकात १ बाद ७ धावा झाल्या होत्या.

<><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा जोडीदार मॅथ्यू एब्डेन या जोडीनं उपांत्य फेरीत धडक मारली. अटीतटीच्या सामन्यात त्यांनी बेल्जियमच्या जोडीचा ७-६, ५-७, ६-१ असा पराभव केला. पहिलाच सेट टायब्रेकरमध्ये जिंकल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये बोपण्णा आणि एब्डेन यांची कामगिरी थोडीशी खालावली आणि प्रतिस्पर्धी जोडीनं दुसरा सेट जिंकला. मात्र, बोपण्णा आणि एब्डेन यांनी जोरदार पुनरागमन करून तिसरा सेट ६-१ असा सहज खिशात घातला आणि उपांत्य फेरीतलं स्थान नक्की केलं.

<><><><>

नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढल्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल असून, येत्या  ३ ते ४ दिवसांत मध्य अरबी समुद्र आणि कर्नाटकाचा उर्वरित भाग, दक्षिण महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेशचा किनारपट्टी भाग, छत्तीसगड, ओदिशा, पश्चिम मध्य आणि वायव्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागात तो पुढे सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><>//